# प्रार्थनासंगीत.

## भाग दुसरा.

---

मुंबईत,

“ इंदुप्रकाश ” छापखान्यांत छापिलें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

म. ग्रं. सं. ठाणें ६४

विषय: काव्य

लेखक: वि. प. पंडित

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव: प्रार्थनासंगीत भाग २रा.

काव्य १८०
मराठी ग्रंथ संग्रहालय नं० ठाणें सन १८९

# प्रार्थनासंगीत.

## भाग दुसरा.

१. राग—ललत; ताल—त्रिवट.

अनुपम प्रेम तुझें परेशा भवभीति विलया नेसी ॥ध्रु० ॥ मानव पामर पाप मंद तरी ही निज गभीर आनंद, शुद्धि, सत्य भक्तां चित्तीं दाविसी ॥ १ ॥ धन्य तूं सकललोकपिता अपत्यां देसी पादरतां नतां पद उच्च दीनां न अव्हेरिसी ॥ २ ॥

२. राग—ललत; ताल—आडा.

न जाती शरण तुला जरी हे अधम नर। तरी ते तरतील कसे संसारजलधि पार ॥ ध्रु० ॥ न जाणती भजन साधन, प्रेमहीन, भक्तिहीन, चिरदुःखी तुझीं पातकी संतानें; सकलांसि करिसी पार, तूंचि मूलाधार, दासांसी दे चरण तरी कृपा कर ॥ १ ॥ नाहीं आह्मां कांहीं शक्ति, हे जगत्पती, कशी तरी पावूं मुक्ति, तुझ्या कृपेविना, आमुचा सर्वपरि भार, तुझ्याचि मात्र दयेवर, तुझ्या करुणेनें मिळे आह्मां पातक्यां उद्धार ॥ २ ॥

३. राग—प्रभाती; ताल—एका.

आठवूं प्रेमें परमेश्वर भक्तजना तूं सखा ॥ सांभाळुनियां निज

दासातें देशी नित्य सुखा ॥ ध्रु० ॥ अनंत प्रीति अपार करुणा अगम्य तूझी कळा ॥ अगाध तूझें ज्ञान भासतें सीमा न दिसे बळा ॥ अतर्क्य चातुर्यानें केलें भूषित त्वां भूतळा ॥ मिठी घालितों सद्भावानें तुझ्या मंगला गळां ॥ १ ॥ आठवूं प्रे० ॥ त्रिभुवन तूझी कीर्ति गातें काय गावि मानवें ॥ मतिहीन तुज जोडूं पाहूं आळवुनियां स्तवें ॥ अनेक रिपु संसारीं गांजिति त्यांस वारावें ॥ मोक्षसाधन देवा आह्मां अंतीं बा व्हावें ॥ २ ॥ आठ० ॥ कृपा सदोदित तूझी आह्मां दीना वरती असो ॥ तुझ्या भक्तिचा प्रेम देवा दासां त्द्दयीं वसो ॥ जेणें तूझी विस्मृति पडते ती बुद्धि मज नसो ॥ आजं केला उत्सव आह्मी तुज तो मान्य असो ॥ ३ ॥ आठवूं० ॥

४. राग–भैरव; ताळ–चौताळ.

प्रथम शरण जाऊं परमेशा विघ्नहरणा दुःखभंजना ॥ ध्रु० ॥ जगन्नायक आनंदकंद सर्वशक्ति सर्वांतःस्थ कृपासागर जो भक्तां आधार ॥ १ ॥ प्रथम० ॥

५. राग–बिभास ; ताळ–चौताळ.

तयास गाउं रचिलीं जेणें नभोवितान चित्रमही । भानु पाहा हा तमा झाडी सौवर्ण करांनीं ॥ ध्रु० ॥ सस्मित सानंद गिरि

वन महार्णव जीव जंतु, रम्य शोभा ।निर्मिलि ही जयाने ॥ १ ॥
तयास गाउं० ॥

### ६. राग—विभास; ताल—आडा.

तूजविण कोण वारिरे मनवेदना । अन्य कोण कुठे असे भवत-
रणसाधना ॥ ध्रु० ॥ उत्कंठित भयाकुल, अनुक्षणीं असे त्हृदय,
संतानीं करुणा करीं, करीं तरी अभयदाना ॥ १ ॥

### ७. विभास—(भुपाळी.)

प्रभु तेजोमया । पुण्यरूपा दया । शांतिसौख्यालया । दास वाहूं॥१॥
त्वत्कृपें पावल्या । पूर्णते आलया । अर्पितों तूज या । राखिं नाथा॥२॥
पुण्यशीला तरी । शुद्ध यातें करीं । राहिं चिर अंतरीं । चिद्रुपा गा
॥३॥ तेंवि त्हन्मंदिरीं । वास देवा करीं । पुण्यमार्गा परी । लाविं
दासां ॥ ४ ॥ अल्प आह्मी अति । वाढवीं जगपाति । भरुनियां
ऊरती । मंदिरीं या ॥ ५ ॥ भक्तिच्या साधना । येथ लावूं मना ।
आवरूं वासना । इन्द्रियांच्या ॥ ६ ॥ त्यागुनी दुर्मदा । कामना
त्वत्पदा । पाववूं सर्वदा । होउ ऐसें ॥ ७ ॥ बंधु भागिनी तुला ।
आळवूं प्रेमला । कोमला वत्सला । मायबापा ॥ ८ ॥

### ८. राग—विभास; ताल—एका.

सदानंद सुखदायक भगवन् उठुनि सुप्रभातीं ॥ प्रेमल वंदन
करुनी मंगल तुझें दास गाती ॥ ध्रु० ॥ अनुदिन भोगुनि

सुखें अशाश्वत आम्हि नाहिं धालों ॥ ऐसे सखया त्रिभुवन-नाथा संसारीं गढलों ॥ विवेक करितां जागृत होउनि दर्शनाशि आलों ॥ स्मरोनि चित्तीं देवा तुझिया पदीं शरण आलों ॥ भवसागर हा घोर पाहुनी प्रभो फार भ्यालों ॥ पैलतिरातें हस्तें न्यावें चरणीं दृढ लागलों ॥ १ ॥ सदानंद सुखदायक० ॥ अंतरिंचा हे पूर्ण दयानिधि कलंक अवघा हरीं ॥ जगज्जीवना सद्भावानें त्हद हें आमुचें भरीं ॥ प्रभु तुझी होतां कृपा काय तो षड्रिपुमेळा करी ॥ न चले त्याचें कांहीं तूझ्या कृपेपुढें क्षणभरी ॥ संकट पडतां धांवुनि येशी त्राणातें अवसरीं ॥ मृत्युपाश हे तोडुनि आह्मां नेशी आपुल्या घरीं ॥ २ ॥ सदानंद सुख० ॥ सुस्थिर चित्तें क्षणेक घडुंदे अनुष्ठान आतां ॥ चंचळ मन हें भ्रमो न कोठें तुझे पाय ध्यातां ॥ निष्फळ होती श्रम अवघे ते स्थळीं अन्य जातां ॥ घडेल केवीं सद्भक्ती वा विषयांमाधें रमतां ॥ दवडुं कशाला व्यर्थ काळ तो व्यग्र चित्त होतां ॥ विषयांची प्रभु आस नसोंदे तुझ्या पदा स्मरतां ॥ ३ ॥ सदानंदसुख० ॥

९. राग–रामकक्री; ताल–त्रिवट.

तुजविण कोण कोण करी कृपा देइ धैर्य तूं जनक सखा तारक ॥ ध्रु० ॥ तुज० ॥ काल हरी क्षणें सर्वहि, देखत नेइ

काव्य ६

धन जना, कातर व्यथितचि होइ चित्त ॥ १ ॥ तुज० ॥ त्याप्रत औषध जाज्वल वा तव प्रेमिं भरंवसा, पातक मम पण आड ये त्या ॥ २ ॥ तुज० ॥ नाथ अघा हरिं भावजलें भरिं व्याकुल हृदया घालविं मृतिभय तारिं दीना ॥ ३ ॥ तुज०

१०. राग—आल्हैया; ताल—एका.

मिथ्या या विषयापाठीं श्रमतां कां रे ॥ ध्रु० ॥ या करूं ध्यान या गाऊं मंगल । साधूं चिर स्वात्मसुखा ॥ १ ॥ मिथ्या० ॥ ध्यानीं तत्पर, कीर्तनीं चातक । ऐशां प्रभु देई शांति ॥ २ ॥ मिथ्या० ॥ मुक्तीचें वर्म, लाभलें त्यासची । जेणें साधियली शुद्धि ॥ ३ ॥ मिथ्या० ॥ आवडे देवा, तोषवी, तोही । जेणें आकळिलें चित्ता ॥ ४ ॥ मिथ्या० ॥

११. राग—जीवनपुरी; ताल—त्रिवट.

दीनजनोद्धर विश्वाधारा । सज्जन रंजति गुणगानीं प्रीति तुझी हेचि ॥ ध्रु० ॥ अतुल दुरिताचा संभार । पदरिं वाहों । रुचि नसे तिळभर शाश्वत सुखा ठायीं मूढां ॥ १ ॥ निबिड मनिं झाला अंधार । पटल दृष्टि । आह्मां दिसे न सुखद स्वरूप जाचलों तें फार ॥ २ ॥ सकल मंगलाचें भांडार । सदय दाता । असतां तूं अन्यत्र झिजत फिरों शांतीलागीं ॥ ३ ॥ सत्पथ त्यजियेला यासाठीं । क्षण न

सांडूं । पहा करूं अनुताप पावन करीं बा कृपेनें ॥ ४ ॥

१२. रागिणी–भैरवी ; ताल–तिताल.

होऊं गडे हो दास । भावें होऊं०। प्रभुरायाचे ॥ध्रु० ॥ पुरवि मनोरथ सद्गति देई जो । धरुं हो तयाची कास ॥ १॥ प्रेमानें धरुं हो० ॥ निष्ठेनें धरुं हो० ॥ भक्तिनें धरुं हो० ॥ प्रभु० ॥

१३. आरति, राग—धनाश्री; ताल—त्रिवट.

आनंदें गाजवूं सुदिन देवा । नाम प्रेमल तुझें गाऊं करूं सेवा ॥ध्रु० ॥ क्रोध मत्सर काम त्यागुनियां यांसी । शुद्ध सुमनें अर्पूं तुझिये पायांसीं ॥ १॥ आ० ॥ प्रेम सद्भाव भक्ति नैवेद्य हा दावूं। तज्जनित आनंद मिष्टान्न हें सेवूं ॥ २ ॥ आ० ॥ भजन कीर्तन तुझें हेंचि आज काम । संतोषें मनें भावें करूं हें निष्काम ॥ ३ ॥ आ० ॥ कर्त्ता दाता त्राता तूंची आह्मां महोदार । दास एकरवें करूं तुझा जयजयकार ॥ ४ ॥ आ० ॥

१४. पद २–भूपकल्याण.

श्रीहरि भजन परासीं तारी ॥ ध्रु० ॥ हरिभजनाविण न मनीं कांहीं । षड्रिपु संतत वारीं ॥ १ ॥ सत्य ईशातें न भजे त्याची । खटपट व्यर्थचि सारी ॥ २ ॥ दृश्य न ईश्वर म्हणुनि न दंडिल । ऐसें मनिं न विचारीं ॥ ३ ॥ भवनद पारद ईशा भज तूं । श्रीहरि दुःख निवारी ॥ ४ ॥

१५. राग—भूप; ताल—त्रिवट.

शरणागत पदरीं घ्या हो ॥ दोषी महा परि हा चरणीं नत याची क्षमेसी ॥ ध्रु० ॥ अनन्य अगतिका ऊठ ह्मणा हो ॥ स्वीकरा पतकरिलें सुखकर दास्या अनुतप्तें ॥ १ ॥

१६. राग—यमन; ताल—त्रिवट.

प्रेमें करूं भजना । भगवन् प्रेमें करूं भजना ॥ ध्रु० ॥ तुजविण होई तळमळ जीवा । भेट तुझ्या नंदना ॥१॥ प्रेमें० ॥ कोण तुझ्या समत्हृदयारामा । योग्य असे वंदना ॥२॥ प्रेमें० ॥ आलिंगू जरि त्हृदयीं तूतें । गृह कैचें मदना ॥ ३ ॥प्रेमें० ॥ नामस्मरणें दीनसख्या त्वां । तारियलें दुर्जना ॥ ४ ॥ प्रेमें० ॥ भक्तांच्या वा संकटिं धांवुनी । करिशी तूं अवना ॥ ५॥ प्रेमें० ॥ ऐसा असशी परमदयाळू । देवा सुखसदना ॥ ६ ॥ प्रेमें० ॥ संसारार्णविं मायिकसौख्या। भुलुनी स्मरूं तुज ना ॥७॥ प्रेमें०॥ अशा क्षमा या अपराधांची । करिं तूं दीनजनां॥ ८॥ प्रेमें० ॥

१७. राग—कल्याणी ; ताल—त्रिवट.

दयाळा प्रभो तुझ्या मी धरिलें पदातें तार ॥ कर मज भवपार ॥ ध्रु० ॥ दुःसह या भवतापें बापा शिणलों मी अनिवार॥ लेंकरूं शिणलों मी अनिवार ॥ कर मज० ॥द०॥ १ ॥ काममदादिक क्रूर रिपू हे गांजिति वारंवार । मज दीना

गांजिति वारंवार ॥ कर मज भवपार ॥ द० ॥ २॥ दीन सख्या मज दुःखग्रस्ता अन्य नसे आधार ॥ तुजविण अन्य नसे आधार ॥ कर मज० ॥ द० ॥ ३ ॥ अससि कराया तूंचि समर्थ सुतर जो दुस्तर फार ॥ भवसिंधु सुतर जो दुस्तर फार ॥ कर म० ॥ दया० ॥४॥ शरण तुला हें जाणुनि आलों माझा घे कैवार॥ पतित मी माझा घे कैवार ॥ कर मज० ॥ दया० ॥ ५ ॥

१८. राग—छायानट ; ख्याल, ताळ—त्रिवट.

धांवरे पावरे । न सोसवे ही व्याधी रिपू गांजिती पीडिती तयां वारुनि राखिजे अपुल्या ब्रिदासी ॥ ध्रु० ॥ प्रबल शक्ति तुझी । मात्र हटविल यां योजिं ती सोडावें पामर कवच बळकट दिजे प्रेम भक्ति भावरे ॥ १ ॥

१९. राग—बागेसरी; ख्याल, ताल—धिमा तिताला.

प्रीति लागो तुझीये दृढतर पायीं ॥ ध्रु० ॥ प्रभो तुवां जननी पित्यापरी पाळितां कृतघ्नें टाकिलें ॥ १ ॥

२०. राग—कानडा; ताळ—त्रिवट.

स्तवनीं लागा परमेशाच्या । जातो काळ वायां रे ॥ ध्रु० ॥ स्तव० ॥ सत्सुख सोडुनी उगा कां रे । भुलतां तुह्मी प्रपंचा रे ॥ धन सुत दारा आप्तही सारे ।व्यर्थ सर्व पसारा रे ॥ १ ॥ स्तव० ॥

वा:क्राव्य २७८



भवजलडोहीं बुडतां वारे । कामा नये बाप माय रे ॥ आपुल्या चित्तीं भाव करा दृढ । सोडा दंभ असार रे ॥ २ ॥ स्त० ॥ पतितपावन जोडुनि प्रेमें । लागा भजनिं अनिवार रे ॥ दास तुमचा तुह्मां प्रार्थी । ध्यावा विश्वाधार रे ॥ ३ ॥ स्तव० ॥

२१. राग—काळंगडा; ताळ—त्रिमात्रिवट.

आलों द्वारीं दाता नका फिरवूं हो ॥ध्रु०॥ भक्तिश्री द्या पतित अनाथा । अन्य सदनीं मिळे न हें दान ॥ १ ॥

२२. राग—परज; ताळ त्रिवट.

देइं दयानिधि बापा । दर्शन देइं हरीं भवतापा ॥ ध्रु० ॥ प्रचुर दुःखें होई, त्द्दय विदीर्ण । किती करूं विलापा ॥ १ ॥ देइं० ॥ संनिध जरी परी, दिससि न दासा । कशी न करिशी कृपा ॥ २ ॥ देइं० ॥ तव गुज हें न कळे, जडमति दीना ॥ नुजाळिसि कां चिद्दीपा । ३ । देइं । सतत मारीं हांका, नच फळ कांहीं । हरिसि कधीं मम पापा ॥ ४ ॥ देइं० ॥ बहु शिणलों देवा, बुडतोंचि पाहीं । न करिं कृपाघन कोपा ॥ ५ ॥ देइं० ॥ सुविनत बा भावें, शरण मी आलों । घे पदरीं सद्रूपा ॥ ६ ॥ देइं० ॥

२३. राग– सोहोनी; ताळ—सुरभक्ता.

हृदय धांव रसभरें जेथें परमेश्वर नित्य सखा तव प्रिय सुख० कर रे ॥ ध्रु० ॥ भ्रमवि विशाल ब्रह्मचक्र आति सुंदर रे ।

अनाद्यंत महेश अक्षर रे ॥ १॥ हृदय० ॥ करिति धरा समुद्र शैल शशि दिनकर रे । यशोगान तदीय सुस्वर रे ॥२ ॥ हृदय०॥ दिशि दिशि पूजिं सौख्य घेइ जन तत्पर रे । न जाणे परि अंत बुधवर रे ॥ ३ ॥ हृदय० ॥ वद पडला कसा तयाचा हृदय विसर रे । न दे शांति प्रपंच नश्वर रे ॥ ४ ॥ हृदय० ॥

२४. राग–हिंडोल ; ताल–त्रिवट.

याहो गडे याहो गडे निजहित साधूं ॥ ध्रु०॥ गगन मंदिरीं । गभीर सागरीं । गिरिगव्हरीं । हृदयीं, भूतनाथा धुंडूं हो । सदया ॥ निज० ॥१ ॥ तळमळ न मिटे । भय न सुटे । जरि नुमटे । अंतरीं, कृपासिंधु । ध्याऊं हो सखया ॥ निजहित० ॥ २ ॥

२५. राग—देस; ताल—त्रिवट.

तूं आमुचा आधार । दयाळा ॥ ध्रु० ॥ सत्यस्वरूपा परम पुरुषा । आह्मी शरण बहुवार ॥ १ ॥ द० ॥ स्थूल पसारा केसा केला । असून तूं निराकार ॥ २ ॥ द० ॥ विसरुन तुजला भुललों जगाला । परि दासातें तार ॥ ३ ॥ द० ॥ न कळे तुझा अंत कदाही । असून जवळि तूं फार ॥ ४ ॥ द० ॥ पातकनाशना दीनदयाळा । भवसिंधु करिं पार । ५ । द० ।

२६. जिल्हा—बरुवा; ताल–त्रिवट.

देवा विनवूं निष्ठेनें ॥ उद्धरीं तूं दासारे ॥ मंगला उद्धरीं

बा. काव्य २५८



तूं ॥ दासारे ॥ ध्रु० ॥ दुरिता पायीं बुडोन सारे, जातों भव-दुःखा माजीरे ॥ अशाश्वताचा संग्रह करुनी, भोगूं विलासारे ॥ १ ॥ काळासंगें खेळ खेळतों, परि हा अंतीं फसवीरे ॥ केव्हांच गिळिल काया याचा, मायीक फांसारे ॥ २ ॥ रानो रानीं फिरतों परि बा, होईना त्वद्भेटीरे ॥ व्यर्थ नेणते देहा दंडूं, भोगुनियां त्रासारे ॥ ३ ॥ कोमळ अंतःकरणीं असुनी, धाम तुझें हें संनिधरे ॥ तेथ न शोधूं जगीं धुंडोनी, करुं आयासारे ॥ ४ ॥ चरणाठायीं विश्वासातें, धरितों दीना श्रांतांला ॥ पदरीं घेईं, गातों ध्यातों, त्हृदय निवासारे ॥ ५ ॥ देवा० ॥

२७. जिल्हा मांझ; ताळ—त्रिवट.

वत्सला करुणानिधे, धांव घे संकटीं, हें चि मागेंरे ॥ ध्रु० ॥ तव किंकर हे, दीन पहा बुडों, ह्या भवसिंधुमधीं, सांवरीं आह्मांरे १ ॥ वत्सला० ॥ तुजविण कोणा, येइ दया सख्या, सांग विभो विमला, अंत न पाहींरे ॥ २ ॥ वत्सला० ॥ अपराधी तुझे यास्तव कां, दयाळा, करिशी न कृपा, ऐसें न करिंरे ॥ ३ ॥ वत्सला० ॥ जरि त्यागीसी तूं, जाऊं कोठें कोणा, द्वारीं मिळे आसरा, त्यागुं नकोरे ॥ ४ ॥ वत्सला० ॥ चिरकाल तुझी, भक्ती घडो नको

आस कदा विषयीं, हें चि देईंरे ॥ ५ ॥ वत्सला० ॥

२८. जिल्हा–झिंजोटी ; ताल–एका.

देवा पायीं तुझ्या मन लागोरे ॥ ध्रु० ॥ धुंडानि सारें जग अ-विचारें, अतां शाश्वत सुखा मागों रे ॥ १ ॥ दे० ॥ भुलनी जगींच्या क्षणिक सुखातें, मत्तगजासम वागों रे ॥ २ ॥ दे० ॥ कर करुणा कीं जेणें आह्मी, असत्पथातें त्यागों रे ॥ ३ ॥ दे०॥ त्वच्चरणांची निश्चळ भक्ति, त्हृदयीं अमुच्या जागो रे॥ ४ ॥ दे०॥

२९. श्लोक–मालिनीछंद.

अनुदिन तुज देवा शुद्धभावें नमावें। रत तव गुणगानीं होउनीयां रमावें ॥ न कधिं विषयसौख्या सेवुनी गुंग व्हावें। परि चिर सुख शांती या सदा मेळवावें ॥ १ ॥ त्यजुनि सकल लज्जा संतसंगें दयाळा। निशिदिनिं तव कंठीं घालुं वा प्रेम-माळा ॥ घडविं तनयहस्तें मागुं हें तूजपाशीं। तुजविण घडवीता नाहिं कारुण्यराशी ॥ २ ॥ दृढतर मन लागो पायिं तूझ्या उदारा। क्षणभर विसरोनी सर्व संसारभारा ॥ घडिभर तरि होऊ मंगला भेट तूझी। हृदयिं तुज धरोंदे आवडी हेचि माझी ॥ ३ ॥ प्रभु तव यश गातां चित्त संतोष पावे। प्रियतम विभु वाटे नाम जेवीं जपावें ॥ विनविं मज घडोंदे सर्वदा पायिं सेवा। तव पदरजिं मोठें मानिं मी सौख्य देवा ॥ ४ ॥

३०. अभंग—राग-सरफरदा.

देवा राहो निरंतर । शुद्ध आमुचें अंतर ॥ १ ॥ तुझा सोडूं ना पदर । आह्मां अंधां तूं आधार ॥ २ ॥ तुझ्या कृपेनें दुस्तर । क्रमूं दुर्घट संसार ॥ ३ ॥ दुःखें गांजिती दुर्धर । करीं त्यांचा तूं संहार ॥ ४ ॥ क्षणोक्षणीं बा अपार । दुष्ट करूं अनाचार ॥ ५ ॥ वाटे झालों भूमीभार । दीनवाणे आह्मी नर ॥ ६ ॥ झाला संदेह तो फार । घालिं मनीं सुविचार ॥ ७ ॥ देवा विवेका सांवर । घेईं दासांचा कैवार ॥ ८ ॥ देईं मागतों उद्धार । तूंचि प्रेमाचा सागर ॥ ९ ॥

३१. श्लोक (शिखरिणी)

प्रभो पूर्णानंदा अखिल सुखदात्या प्रियकरा जगत्स्रष्टया ईशा चरणकमलां दे बघुं नरां । तुझ्या पादा वंदूं विनत बहु प्रार्थूं निरुपमा प्रतापें नाशावें सदयत्हृदयें अंतर तमा ॥ १ ॥ अजी मांडीयेलें भजन सुमनें पाहिं जनका तशी शक्ती द्यावी दिधलि जशि त्वां व्यास सनका । तुझी लीला गाया सकल वसुधे सौख्यद विभो तुझ्यावीणें नाहीं सबल सहकारी इतर भो ॥ २ ॥

३२. अभंग; राग—परज.

दासांच्या तारणा पापांच्या हरणा । येऊं दे करुणा दीनबं-

धु ॥ १ ॥ कृपेच्या सागरा दयेच्या माहेरा । आह्मांलागीं तारा दीन० ॥ २ ॥ एक तुझी आस आहे बा आह्मांस । पाव रे दासास दीन० ॥ ३ ॥ तुजाविण दुजा कोण दासें ध्यावा । भाव माझा राहवा तुझे पायीं ॥ ४ ॥ तुझे पायीं चित्त राहों दे निमग्न । होउनियां भग्न पश्चात्तापें ॥ ५ ॥ पश्चात्तापें भग्न झालेलें हृदय । गावो बा सदय तुजलागीं ॥ ७ ॥ तुजलागीं हेंच सदय मागणें । भक्तांस रक्षणें दास ह्मणे ॥ ८ ॥

33. श्लोक (शार्दूलविक्रीडित)

नामाचा जयघोष होउ सदया देवा तुझ्या सर्वदा । आह्मां दूरत्यजिरा निराश्रित जना ऐसें घडेना कदा ॥ काया ही अवघी दयेविण तुझ्या प्राणा न दे आसरा । ज्ञानी तूं असती समर्थ सखया प्राणस्वरूपी खरा ॥ १ ॥

समाप्त.